दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● शुक्रवार दि.१२ सप्टेंबर २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक २७ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Friday 12 Sep 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 27 ● Pages 4 ● Rate 4 Rs

प्रतिनिधी नेमणे आहे

लोकप्रिय विभागीय दैनिक वादळ वार्ता साठी महाराष्ट्रात सर्वत्र जिल्हा, तालुका, सर्कल व गावस्तरावर प्रतिनिधी नेमणे आहे. तरी इच्छुकानी मो.न.9422660077, 9766440025 संपर्क साधावा.

# महामंडळाच्या योजनांचा लाभ पात्र लाभार्थींना द्या:अजित पवार यांचे निर्देश

## ‘सारथी’सह अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या कामकाजाचा आढावा

### निधीची कमतरता भासू देणार नाही

यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्थेच्या (सारथी) कामाचा आढावा घेतला. सारथी मार्फत राबवण्यात येणाऱ्या विद्यार्थ्यांचा कौशल्य विकास, शिष्यवृत्ती, स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण, संशोधन, स्वाधार योजना, परदेशी शिष्यवृत्ती योजना व वसतिगृह यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर चर्चा झाली. विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी कौशल्य विकास व प्रशिक्षणाला प्राधान्य द्यावे. तसेच मुलांच्या शिक्षण व प्रगतीसाठी निधीची कमतरता भासू देणार नाही, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.



**मुंबई (वृत्तसंस्था)**–अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या वतीने राबवण्यात येणाऱ्या प्रत्येक योजनांचा लाभ समाजातील योग्य व पात्र लाभार्थींपर्यंत पोहोचला पाहिजे, यासाठी विशेष काळजी घेण्यात यावी. या योजनांची अंमलबजावणी पारदर्शक व परिणामकारक पद्धतीने होऊन अधिकाधिक लाभार्थींना त्याचा फायदा व्हावा, यावर भर देण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले. तसेच छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्थेच्या (सारथी) कामाचा आढावा त्यांनी घेतला.मंत्रालयातील उपमुख्यमंत्री कार्यालयाच्या समिती कक्षात अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या कामाचा आढावा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी घेतला. यावेळी अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, नियोजन विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, सहकार विभागाचे प्रधान सचिव प्रविण दराडे, नियोजन विभागाचे सहसचिव विवेक गायकवाड यांच्यासह दूर दृश्य प्रणालीद्वारे सहकार आयुक्त दीपक तावरे, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ राजेश देशमुख, अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक विजयसिंह देशमुख, महाराष्ट्र बँकेचे महाव्यवस्थापक अरुण कबाडे, अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे उपमहाव्यवस्थापक आकाश मोरे, सहकार विभागाचे सहसचिव संतोष पाटील उपस्थित होते.उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील सुरक्षित बेरोजगार तरुणांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचे प्रमुख उद्दिष्ट आहे. त्यासाठी वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना, गट कर्ज व्याज परतावा योजना, गट प्रकल्प कर्ज योजना अशा विविध योजना राबवण्यात येतात. या योजनांची अंमलबजावणी पारदर्शक व परिणामकारक पद्धतीने होऊन अधिकाधिक लाभार्थींना त्याचा फायदा व्हावा. या योजनांची माहिती गरजूंपर्यंत योग्य प्रकारे पोहोचवणे ही महत्त्वाची जबाबदारी असल्याचे सांगून, योजनांचा प्रचार-प्रसार प्रभावीपणे करण्याच्या सूचनाही उपमुख्यमंत्र्यांनी दिल्या.

### प्रशासनाने जबाबदारीने काम करण्याच्या सूचना

महामंडळ मार्फत राबवण्यात येणाऱ्या योजनांच्या लाभाच्या प्रक्रियेत कोणतीही अडचण येऊ नये तसेच योग्य लाभार्थींची निवड करून त्यांना वेळेवर आर्थिक मदत मिळावी यासाठी यंत्रणांनी विशेष लक्ष देण्याच्या सूचना देत उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, महामंडळाच्या योजनांमुळे तरुणांना व्यवसाय, उद्योग व उद्यमशीलतेसाठी प्रोत्साहन मिळते आणि त्यामुळे राज्यात स्वयंरोजगाराच्या संधी वाढीस लागून आर्थिक प्रगतीला चालना मिळते. त्यामुळे या योजना अधिक प्रभावीपणे राबवून त्याचे परिणाम समाजाच्या तळागाळापर्यंत दिसून यावेत, यासाठी प्रशासनाने जबाबदारीने काम करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

# मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणार्थींचे मानधन द्या-युवा प्रशिक्षणार्थींची मागणी

**केज । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील महायुती सरकारने राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार देण्यासाठी निवडणुकीच्या तोंडावर सहा महिन्यांसाठी मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणार्थी म्हणून योजना काढली. त्यात अनेक तरुणांना अल्प रोजगार मिळाला.मात्र हा रोजगार देण्यात प्रशासनाच्या वतीने दिरंगाई होत असून गेल्या दोन महिन्यासह ऑगस्ट महिन्याचे मानधन थकले असून ते तात्काळ देण्याची मागणी मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणार्थी यांनी केली आहे.

सरकारने राज्यातील अंदाजे १ लाख ३४ हजार मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणार्थींना रोजगार उपलब्ध करून दिला.बेरोजगार तरुणांच्या हाताला काम दिले आहे. मागील सहा महिन्याचा कार्यकाळ पूर्ण केल्यानंतर पुढे पाच महिने वाढीव देण्यात आले आहे. राज्यातील मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व त्या खात्याचे मंत्री हे युवा




प्रशिक्षणार्थींच्या भावनेची कदर करून युवा प्रशिक्षणार्थींना हक्काची कायमस्वरूपी भाकरी मिळवून देण्याची मागणी ही मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणार्थी यांच्याकडून वारंवार करण्यात येत आहे. तरी प्रशासनाने युवा प्रशिक्षणार्थींचे थकित मानधन वाटप करून दिलासा द्यावा अशी मागणी करण्यात येत आहे.

# कुंडी-होराफळी घाट रस्त्याची दुरवस्था, खड्डे व खचलेल्या भागामुळे वाहनधारकांना धोका

## अक्कलकुवा तालुक्यात खड्ड्यांमुळे अपघात होण्याची भीती उपसरपंच अर्जुन वळवी यांनी केली दुरुस्तीची मागणी

**मोलगी । रवींद्र वळवी**

अक्कलकुवा तालुक्यातील कुंडी-होराफळी या घाट रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले असून, रस्त्याचा काही भाग खचल्याने तो अत्यंत धोकादायक बनला आहे. पावसाचे पाणी साचल्यामुळे खड्ड्यांचा अंदाज येत नसल्याने वाहनचालकांना अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. या मार्गाच्या त्वरित दुरुस्तीची मागणी होराफळीचे उपसरपंच अर्जुन वळवी यांनी केली आहे.

हा रस्ता मोरखी, खडकापाणी, वालबा, चिखली, होराफळी, टोकणापिपरी, डोटकी, ओढी, आणि बेहटी यांसारख्या अनेक गावांना जोडतो. त्यामुळे या भागातील शेकडो नागरिकांची आणि वाहनधारकांची ये-जा या रस्त्यावरून असते. सध्या रस्त्यावरील खड्डे आणि खचलेल्या भागामुळे वाहनचालकांना विशेषतः रात्रीच्या वेळी प्रवास करणे कठीण झाले आहे.

उपसरपंच अर्जुन वळवी यांनी सांगितले की, प्रशासनाने या गंभीर समस्येकडे त्वरित लक्ष द्यावे. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आणि वाहतूक सुरळीत होण्यासाठी या रस्त्यावरील खड्डे बुजवून खचलेल्या भागाची तातडीने दुरुस्ती करणे आवश्यक आहे. अन्यथा, भविष्यात मोठे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.



# चार लाखांची पिशवी हिसकावल्याप्रकरणी आरोपींना पाच दिवसांची पोलिस कोठडी

**केज । गौतम बचुटे**

केज शहरातील सरकारी दवाखान्याजवळ ऊसतोड मुकादमाच्या हातातील चार लाख रुपयांची पिशवी हिसकावून पळ काढणाऱ्या आरोपींना अखेर पोलिसांच्या सतर्क तपासामुळे गजाआड करण्यात आले. या प्रकरणी पकडण्यात आलेल्या आंध्रप्रदेशातील किनारपट्टी भागातील दोघा आरोपींना न्यायालयाने पाच दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. ही घटना काही दिवसांपूर्वी घडली होती. ऊसतोड मुकादम चार लाख रुपये घेऊन मोटारसायकलवरून गावाकडे जात असताना सरकारी दवाखान्याजवळ संशयितांनी दुचाकीवरून येत त्याच्या हातातील पिशवी हिसकावून



पलायन केले होते. घटनेनंतर केज पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत आरोपींचा शोध घेतला. पोलिसांनी परभणी येथील कारागृह प्रशासनाकडून दोन्ही आरोपींना ताब्यात घेत न्यायालयासमोर हजर केले असता, न्यायालयाने तपासाच्या दृष्टीने त्यांना ५ दिवसांची पोलिस कोठडी सुनावली. या कारवाईमुळे परिसरात समाधान व्यक्त होत असून पुढील तपास पोलिस निरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# आदिवासी घरकुलांसाठी गौण खनिज उत्खनन सुरू करा

## काकरडे खुर्द परिसरातील गावकऱ्यांची मागणी

**वडाळी । लाला चव्हाण**

शहादा तालुक्यातील काकरडे खुर्द व परिसरातील गावातील आदिवासी कुटुंबांना शासनाकडून मंजूर झालेली घरकुले पूर्ण व्हावीत यासाठी गावकऱ्यांनी बंद असलेले गौण खनिज उत्खनन तात्काळ सुरू करण्याची मागणी केली आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की गेल्या काही महिन्यांपासून गौण खनिज बंद असल्याने घरकुल बांधकामासाठी आवश्यक असलेली वाळू, दगड, खडी व मुरूम उपलब्ध होत नसल्यामुळे अनेकांचे घरकुलाचे काम अपूर्ण



अवस्थेत थांबले आहे. यामुळे आदिवासी बांधवांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे.गावकऱ्यांचे म्हणणे आहे की, शासन घरकुल योजना जाहीर करते मात्र साहित्य उपलब्ध नसल्याने कामे कागदावरच राहतात. योग्य वेळी कामे पूर्ण झाली नाहीत तर पावसाळा व इतर नैसर्गिक अडचणींमुळे लाभार्थ्यांचे नुकसान होणार आहे.गावकरी व स्थानिक सामाजिक संघटनांनी प्रशासनास निवेदन देऊन, तातडीने गौण खनिज उत्खनन परवानगी देऊन घरकुलाचे काम सुरळीत सुरू करण्याची मागणी केली आहे. अन्यथा आंदोलनाचा इशारा देखील दिला आहे,

# अक्कलकुवा तालुक्यात युरियाचा काळाबाजार उघड; ६८०० मेट्रिक टन युरिया गायब


**नुदरबार । दिपक गोसावी**

बफर योजनेंतर्गत मोठ्या प्रमाणात युरिया उपलब्ध असतानाही, अक्कलकुवा तालुक्यातील शेतकऱ्यांना तो चढ्या भावाने खरेदी करावा लागल्याने संतप्त शेतकरी आणि ग्रामस्थांनी तहसील कार्यालयासमोर जोरदार आंदोलन केले. माजी खासदार डॉक्टर हिना गावित यांनी या आंदोलनात सहभागी होऊन अधिकाऱ्यांची झाडाझडती घेतली, तेव्हा सुमारे ६,८०० मेट्रिक टन युरियाचा हिशोबच नसल्याचे उघड झाले. या घोटाळ्याला स्थानिक लोकप्रतिनिधी, अधिकारी आणि कृषी विक्रेते यांची साखळी जबाबदार असल्याचा आरोप डॉक्टर गावित यांनी केला आहे. त्यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांशी बोलून याप्रकरणी दोषींवर कारवाई करण्याची आणि संबंधित तीन एजन्सीजना (श्रीराम ॲग्रो एजन्सी, दीपभूषण फार्मर प्रोड्यूसर कंपनी, गणेश एजन्सी) ब्लॅकलिस्टमध्ये टाकण्याची मागणी केली. आंदोलन झाले त्याची कारणे म्हणजे बफर योजनेतून युरिया उपलब्ध असतानाही, कृषी सेवा केंद्रांनी खताची कृत्रिम टंचाई निर्माण केली. त्याचबरोबर शेतकऱ्यांना चढ्या दराने युरिया खरेदी करायला भाग पाडले.त्यामुळे खताअभावी पिकांचे नुकसान झाल्यामुळे त्याची त्वरित पंचनामे करून नुकसानभरपाई देण्याची मागणी.ही होत या जनआक्रोश आंदोलनात डॉक्टर गावित यांनी अधिकाऱ्यांच्या निष्क्रियतेवर कठोर टीका केली. अखेरीस, जिल्हा कृषी अधीक्षक चेतनकुमार ठाकरे यांच्या आदेशानुसार, तालुका कृषी अधिकारी सुरज नामदास आणि इतर कृषी अधिकाऱ्यांनी ११ सप्टेंबर, २०२५ पर्यंत या प्रकरणाची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याचे लेखी आश्वासन दिले. त्यानंतर आंदोलकांनी आंदोलन तात्पुरते स्थगित केले. या आंदोलनात माजी जिल्हाध्यक्ष नागेश पाडवी यांच्यासह अनेक स्थानिक नेते, कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते. त्यांनी भाषणातून शेतकऱ्यांच्या समस्या आणि अधिकाऱ्यांची मनमानी मांडली.



## संपादकीय

# आणखी एका शेजाऱ्याच्या घरात...



शेजारच्या घरात आग लागते, त्याची धग आपल्यापर्यंत येते; त्यामुळे नेहमी काळजी घ्यावी, असं म्हटलं जातं. देशाच्या पातळीवर विचार केला, तर भारताच्या शेजारी असलेल्या मित्र राष्ट्रांमध्ये ज्या घडामोडी वेगाने घडत आहेत, त्याकडे काळजीपूर्वक लक्ष देण्याची गरज आहे. गेली अनेक दशके शांत असलेला नेपाळ अलीकडच्या काळात अस्थितरतेच्या गर्तेत का सापडला आहे? याची कारणं त्यासाठी शोधावी लागतील. मंत्र्यांना आंदोलकांनी घरात घुसून सळो की पळो करून सोडलं, नेपाळच्या राष्ट्रपतींसह पंतप्रधान, गृहमंत्र्यांना २४ तासांत राजीनामा द्यावा लागेल, हे दोन दिवसांपूर्वी कोणाच्या स्वप्नात आले नसेल. पण, ते प्रत्यक्ष घडलं. पशुपतीनाथाच्या भूमीत जनतेचे तांडवरूपी रौद्ररूप पाहून सत्तेच्या सिंहासनावर बसलेल्यांना पायउतार व्हावं लागलं. नेपाळ सरकारने नुकतेच एक नवीन विधेयक संसदेमध्ये आणलं होतं, ज्यात परदेशात चालविणाऱ्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मना स्थानिक प्रतिनिधी नियुक्त करणं हे बंधनकारक केलं होतं. त्यानंतर, ४ सप्टेंबरला नेपाळ सरकारने फेसबुक, इंस्टाग्राम आणि यूट्यूबसह २६ सोशल मीडिया ॲप्सवर बंदी घालण्याचा निर्णय घेतला. हे प्लॅटफॉर्म नेपाळच्या दळणवळण आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाकडे नोंदणीकृत नसल्याचा सरकारचा आक्षेप होता. नेपाळ सरकारने जर सोशल मीडिया ॲपवर बंदी घातली, ती सर्व अमेरिका आणि युरोपमधील असल्याने चीनमध्ये त्यावर आधीपासूनच बंदी आहे. चीनने पाश्चात्य देशांची विचारसरणी रोखण्यासाठी स्वतःचे ॲप विकसित केले आहेत. नेपाळमध्येही त्याच धर्तीवर प्रयत्न सुरू केले गेले. दुसरीकडे चिनी ॲप्सवर का बंदी घालण्यात आली नव्हती, याचंही नेपाळी जनतेला आश्चर्य वाटत होतं. नेपाळमधील युवावर्गामध्ये नेपाळ सरकारच्या या निर्णयाने प्रचंड संतापाची लाट उसळली. राजधानी काठमांडूसह देशभरात निदर्शनं उसळली. संतप्त तरुणांनी काठमांडूच्या नवीन बाणेश्वर संसद संकुलात घुसखोरी केली. पोलिसांचे बॅरिकेड्स तोडून त्यांनी संसदेच्या आवारात घुसखोरी केली, ज्यामुळे तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली. नेपाळी काँग्रेसचे अध्यक्ष आणि माजी पंतप्रधान शेर बहादूर देऊबा यांच्या बुढानिलकांठा येथील निवासस्थानाचीही निदर्शकांनी तोडफोड केली. हिंसक जमावापुढे सरकारला नांगी टाकावी लागली.नेपाळमध्ये तरुणाईला 'जेन-झी' नावाने संबोधलं जातं. सोशल मीडियावरील बंदीनंतर हा मोठ्या प्रमाणात रस्त्यावर आलेला दिसला. सरकारने मोठ्या खुबीने सुप्रीम कोर्टाची ढाल पुढे करून बंदीचा आदेश आणल्याने युवा वर्गाने सुरुवातीला शांततापूर्ण आंदोलनांची शपथ घेतली. पण, पोलिसांनी त्यांना रोखण्यासाठी अश्रूधुराच्या नळकांड्या आणि पाण्याच्या तोफांचा वापर सुरू केल्याने परिस्थिती चिघळली. मोठ्या प्रमाणात गोंधळ उडाला. डिजिटल जगाशी जोडली गेलेली लाइफलाइन कापली गेल्याने अस्वस्थ झालेला तरुण कसा हिंसक बनतो, याचं या निमित्ताने उदाहरण जगासमोर आलं. केवळ नेपाळमधीलच नव्हे; जगभरातील तरुण पिढी सोशल मीडियाच्या प्रभावाखाली आहे हे यातून दिसून आलं. मांजरीला घरात कोंडून ठेवलं तर ती नरडीचा घोट घेते. आज तरुण पिढीचं तसंच झालं आहे. सोशल मीडियाचा वापर हा तरुणाईच्या जगण्याचा एक भाग बनला असल्याने, अन्य देशात जर अशा बंदीचा निर्णय झाला, तर तिथेही नेपाळसारखी स्थिती उद्भवू शकते, हा इशारा यातून मिळाला आहे.०नेपाळमधील आंदोलनात २१ तरुणांचा बळी गेला आहे. सरकारने सोशल मीडियावरील बंदीचा निर्णय मागे घेण्याची घोषणा केल्यानंतरही आंदोलक शांत झाले नाहीत. आंदोलकांनी पंतप्रधान के. पी. शर्मा ओली यांचं निवासस्थान पेटवून दिलं. विशेष म्हणजे, आंदोलकांच्या प्रमुख मागण्यांमध्ये पंतप्रधान ओली यांच्या राजीनाम्याची मागणी होती. २०२२ च्या नोव्हेंबर महिन्यात नेपाळमध्ये झालेल्या निवडणुका या शेवटच्या सार्वत्रिक निवडणुका होत्या; नेपाळ काँग्रेस (एनसी) हा सर्वांत मोठा पक्ष ठरला असला, तरी 'कम्युनिस्ट पार्टी ऑफ नेपाळ-माओवादी सेंटर'(सीपीएन-एमसी)ने 'कम्युनिस्ट पार्टी ऑफ नेपाळ-युनिफाइड-मार्क्सिस्ट लेनिनिस्ट' (सीपीएन-यूएमएल)शी युती करून सरकार स्थापन केलं. त्यानंतर राजकीय डावपेचातून चार वेळा सत्तापालट झाला आणि २०२४ च्या जुलै महिन्यात सीपीएन-यूएमएल व एनसी या पक्षांनी संधान बांधून सरकार स्थापन केले. के. पी. शर्मा ओली पंतप्रधान पदावर आले. पक्षांच्या जोड्या बदलत राहिल्या, तरी मूळ समस्या तशाच होत्या. प्रशासनासंबंधात एकमत नसणं, एकाच व्यक्तीने एकतर्फी निर्णय घेणं आणि आपल्याला निर्णयप्रक्रियेतून बाहेर ठेवलं जात असल्याची कनिष्ठ पक्षाला भीती वाटणं या बाबी सत्ताधारी पक्षांच्या नेत्यांमध्ये दिसून येत होत्या. या आंदोलनात सहभागी असलेल्या तरुणांनी केवळ सोशल मीडिया बंदीलाच विरोध केला नाही, तर देशात वाढलेल्या भ्रष्टाचाराविरोधातही संताप व्यक्त केला आहे. हुकूमशाही वृत्तीच्या विरोधात रस्त्यावर आल्याचे विद्यार्थ्यांचं म्हणण आहे. भारत आणि नेपाळ या दोन देशांतील संबंध भौगोलिक, ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि धार्मिक समानतेवर आधारित आहेत. १९५० च्या शांती आणि मैत्री कराराने दोन देश जोडले गेले आहेत. या दोन देशांत रोटीबेटी संबंधांबरोबर भाषिक साम्यही आहे. भारताने आतापर्यंत नेपाळच्या सामाजिक-आर्थिक विकासासाठी महत्त्वपूर्ण योगदानही दिलं आहे. हिंदूंची मोठी लोकसंख्या असलेला देश म्हणून ओळख असली तरी बुद्धांचं जन्मस्थान असलेलं लुंबिनी हे स्थान नेपाळमध्ये असल्याने जगभरातील बौद्धधर्मीयांना नेपाळविषयी प्रचंड आस्था आहे. या सर्व पार्श्वभूमीवर बांगलादेश, श्रीलंका, मालदिवसह भारताच्या सीमेवरील देशात अस्थिरता आणि घुसखोरीचा प्रयत्न चीनी भाईकडून सातत्याने सुरू आहे. नेपाळमधील यादवीला तेच कारणीभूत असावेत, असा सूर आंतरराष्ट्रीय पातळीवर उमटतो आहे.

# नवीन प्रभाग रचना ठरणार भाजपसाठी 'गेमचेंजर'

महापालिकेच्या आगामी निवडणुकीसाठी प्रारूप प्रभाग रचना भाजपने आपल्या सोयीचीच ठेवल्याचा आरोप झाला. त्यातच महायुतीमध्ये विसंवाद जाणवत असून, भाजपसाठी प्रतिष्ठेची आणि राष्ट्रवादी अजित पवार गटासाठी अस्तित्वाची लढाई होणार आहे. प्रभाग रचनेवरून उमटणाऱ्या प्रतिक्रिया आणि स्थानिक राजकीय घडामोडींमुळे निवडणूक चुरशीची होणार असल्याची चिन्हे आहे. महापालिकेवर सत्ता मिळवण्यासाठी महायुतीतील भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) आणि शिंदेसेना हे तीनही पक्ष जोरदार तयारीत आहेत.पुणे महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकीसाठी प्रभाग रचना ठरविण्याच्या प्रक्रियेत राजकीय उलथापालथ होत आहे. प्रभाग रचना जाहीर झाल्यापासून विरोधकांनी भाजपवर पक्षपाती कारभाराचा आरोप केला आहे. मात्र नवीन प्रभाग रचना भाजपसाठी खरी गेमचेंजर ठरेल. नवीन प्रभाग रचना इतर पक्षांपेक्षा भाजपासाठी अनुकूल असल्याचेही स्पष्ट झाले आहे. ४१ प्रभाग आणि १६५ नगरसेवकांच्या संरचनेमुळे शहराच्या कोर भागात भाजपला फायदा होईल आणि बहुमत मिळवणे सोपे होईल. ही प्रक्रिया पुण्याच्या राजकीय भविष्याला आकार देणारी असल्याने सर्वच पक्षांमध्ये उत्सुकता आणि चिंता आहे. पीएमसीची निवडणूक गेल्या तीन वर्षांपासून प्रलंबित आहे. २०२२ मध्ये शेवटच्या निवडणुकीनंतर प्रशासकीय राजवटीत चाललेली महापालिका आता निवडणूक घेण्यासाठी तयार होत आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार, राज्य सरकारने जून २०२५ मध्ये सर्व महानगरपालिकांना चार सदस्यांच्या प्रभाग प्रणालीवर आधारित डिलिमिटेशन करण्याचे निर्देश दिले. पुण्यात २०११ च्या जनगणनेनुसार ही प्रक्रिया सुरू झाली आणि ऑगस्ट महिन्यात ड्राफ्ट जाहीर झाला. या ड्राफ्टनुसार, ४० प्रभागांत प्रत्येकी चार नगरसेवक आणि एका प्रभागात (अंबेगाव-कात्रज) पाच नगरसेवक निवडले जातील. एकूण १६५ नगरसेवकांची संख्या पूर्वीच्या १६२ पेक्षा थोडी जास्त आहे, कारण ३२ नवीन गावांचा समावेश झाल्याने लोकसंख्या वाढली आहे.पुण्याचा कोर सिटी आणि पेठ भागात प्रभागांची संख्या



वाढल्याने भाजपला जास्त जागा मिळतील. पूर्वीच्या २०१७ च्या निवडणुकीत भाजपने ९८ जागा जिंकून बहुमत मिळवले होते आणि पहिल्यांदाच महापौरपद मिळवले. त्यामुळे २०१७ चीच प्रभाग रचना कायम ठेवावी आणि नव्याने समाविष्ट झालेल्या गावांसाठी स्वतंत्र प्रभाग करावेत, अशी भूमिका भाजपने घेतली होती. २०१७ ला ज्या प्रभागांत भाजपचेच चार सदस्य निवडून आले होते, त्याच प्रभागांची रचना पुन्हा किरकोळ बदल वगळता पुन्हा तशीच कायम ठेवण्यात आली आहे. त्यामुळे भाजपचे अनेक माजी ज्येष्ठ नगरसेवक सुरक्षित झाल्याचे चित्र आहे. आता नवीन रचनेत कोर भागातील प्रभाग लहान आणि जास्त संख्येने असल्याने भाजपचे पारंपरिक मतदार अमराठी-भाषिक, मध्यमवर्गीय आणि हिंदू-बहुल भागात एकत्र राहतील. उदाहरणार्थ, शनिवार पेठ, मंडई, डेक्कन जिमखाना यांसारख्या भागांत प्रभागांची विभागणी अशी की, भाजपला येथे १०० हून अधिक जागा जिंकण्याची शक्यता आहे. त्यामुळे भाजपसाठी ही प्रभाग रचना फायदेशीर ठरेल, अशी चर्चा राजकीय वर्तुळात होत आहे. नवीन गावांचा समावेश झाल्याने त्या भागात आव्हान आहे. पण कोर भागात भाजपची मजबुती कायम आहे. विधानसभा निवडणुकीत महायुतीने महाराष्ट्रात २३० जागा जिंकल्या, ज्यामुळे स्थानिक निवडणुकीतही ते मजबूत आहेत. पुण्यात भाजपचे ९८ नगरसेवक आहेत, तर एमव्हीएकडे मर्यादित प्रभाव आहे. नवीन गावे (उंड्री, फुरसुंगी वगैरे) जोडल्याने परिधीत जागा वाढल्या, पण तेथेही भाजपने विकासकामांद्वारे पकड मजबूत केली आहे. प्रभाग वाढल्याने एकूण जागा जास्त, पण भाजपला कोरमध्ये ६०-७० टक्के जागा मिळतील. ही रचना गेमचेंजर आहे. भाजपला फायदा होण्याचे कारण म्हणजे महायुतीचे (भाजप, शिवसेना-एकनाथ शिंदे, राष्ट्रवादी-अजित पवार) एकत्र येणे आहे. पीएमसीची वार्षिक बजेट ६,७०० कोटींची आहे, ज्यात रस्ते, पाणी, घनकचरा व्यवस्थापन यांसारखी कामे आहेत. निवडणुकीनंतर नवीन महापालिकेची स्थापना झाल्यास विकासाची गती मिळेल, पण प्रभाग रचनेमुळे राजकीय समीकरणे बदलतील. रहिवाशांच्या आक्षेपांमुळे प्रक्रिया विलंब होऊ शकते, पण अंतिम निर्णयानंतर आरक्षण आणि मतदार यादी विभागणी होईल. पुण्याच्या ४५ लाख मतदारांसाठी ही निवडणूक महत्त्वाची आहे, कारण ती शहराच्या भविष्याला आकार देईल.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार निवडणुका ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२५ मध्ये होण्याची शक्यता आहे. अंतिम प्रभाग रचना १५ सप्टेंबरपर्यंत जाहीर होईल, त्यानंतर आरक्षणाची सोडत आणि मतदार यादी तयार होईल. पीएमसीचा वार्षिक निधी ६,७०० कोटी असून, सत्ताधारी पक्षाला विकासकामांसाठी मोठा फायदा होतो. भाजपने गेल्या काळात रस्ते, पाणीपुरवठा आणि परिवहनावर भर दिला, ज्याचा प्रचार आता जोरदार होईल. प्रभाग रचना ही 'गेमचेंजर' आहे कारण ती भाजपच्या शहरी वर्चस्वाला मजबूत करत आहे. उपनगरातील असंतोष आणि महागाईसारख्या मुद्यांमुळे थोडे आव्हान आहे. पण, ही रचना भाजपला पुन्हा महापालिका सत्तेत आणेल. पुणे महापालिकेची प्रारूप प्रभाग रचना जाहीर झाली. यावर हरकती मागवण्यात आल्या होत्या. शेवटच्या दिवशी २ हजार ८९९ हरकती, सूचना आल्या आहे. कोथरूड बावधन क्षेत्रीय कार्यालय आणि वारजे कर्वेनगर क्षेत्रीय कार्यालयातून सर्वात कमी प्रत्येकी ९ हरकती नोंदविल्या गेल्या. १५ क्षेत्रीय कार्यालयांमधून धनकवडी-सहकारनगर क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीतून सर्वाधिक १ हजार ८९९, नगररस्ता-वडगावशेरी येथून १ हजार २६८ हरकती नोंदविल्या गेल्या आहेत. प्रभाग क्रमांक ३ विमाननगर-लोहगावमध्ये ८१९, प्रभाग क्रमांक १५ मांजरी बुद्रूक-साडेसतरानळी येथून ५५८ आणि प्रभाग क्रमांक ३४ नऱ्हे-वडगाव बुद्रूक येथून २ हजार ६६ हरकती प्राप्त झाल्या आहेत. पुण्यात विशेष म्हणजे प्रभाग रचना जाहीर झाल्यावर लगेच आक्षेप नोंदवले आणि सध्या ५,८०० हून अधिक आक्षेप मिळाले आहे. यापैकी २,००० हून अधिक नरहे-वडगाव बुद्रुक वॉर्डसाठी आहेत. ११ आणि १२ सप्टेंबरला जनसुनावणी होईल. अंतिम रचना सप्टेंबरच्या मध्यात जाहीर होईल. मात्र प्रभाग रचना जाहीर झाल्यानंतर या महापालिकेच्या प्रभाग रचना स्वतःला अनुकूल करून घेतली, काही प्रभाग मोठे, काही प्रभाग लहान ठेवले, नदी नाल्यापलीकडे प्रभाग रचना आखली, अशा पद्धतीचे भरपूर आरोप भाजपावर करण्यात आले. मात्र, भाजपकडून आरोप फेटाळले गेले. एकूणच ही प्रभाग रचना भाजपासाठी फायद्याची ठरणार आहे.

# ओबीसींवर अन्याय होणार नाही; खोट्या नोंदी नकोच!

## चुकीच्या कागदपत्रांच्या आधारे कुणबी प्रमाणपत्र देण्यास आक्षेप

**मुंबई । प्रतिनिधी**

ओबीसींवर मनात आपल्यावर अन्याय होईल अशी भीती आहे. पण, तसे काही होणार नाही. कुणबी नोंदी आहेत,त्यांनाच जीआर प्रमाणे प्रमाणपत्र मिळेल. कुणबी नातेसंबंध, ग्रामसमिती, तहसीलदारांच्या स्तरावरील समितीचा अहवाल घ्यावा लागणार आहेत. वंशावळ जुळल्यानंतर सर्व कागदपत्रांच्या पूर्ततेनंतरच दाखला देण्यात येईल. फक्त खोट्या नोंदी होणार नाहीत याबाबत उपविभागीय अधिकाऱ्यांनी काळजी घेण्याची आवश्यकता असून, शासन निर्णयाप्रमाणेच पुढे जावे. अशी अपेक्षा उपसमितीच्या सर्वच सदस्यांनी व्यक्त केली, अशी माहिती मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष,मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.इतर मागासवर्गीयच्या (ओबीसीं) संदर्भात नियुक्त मंत्रिमंडळ उपसमितीची पहिली बैठक मंत्रालयात पार पडली. अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ, वनमंत्री गणेश नाईक, पाणीपुरवठा व मृदा जलसंधारण मंत्री संजय राठोड, पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, इतर मागास विभागाचे सचिव आप्पासाहेब धुळाज आदी उपस्थित होते.

बैठकीनंतर अध्यक्ष बावनकुळे यांनी सांगितले की, ओबीसींच्या ३५३ जाती आहेत. या जातींवर अन्याय होऊ नये. सुमारे ३,६८८ कोटींचा निधी मिळणे बाकी आहे. त्यामुळे १२०० कोटी रुपयांची शिष्यवृत्ती थांबली असून ती मार्गी लावण्यात यावी. वसतिगृह बांधकाम व शासकीय कार्यालयांसाठी आवश्यक असलेल्या जागा उपलब्ध व्हाव्यात असे प्रस्ताव मंमंत्रिमंडळ उपसमिती समोर ठेवण्यात आले. कुणबी मराठा - मराठा कुणबी प्रमाणपत्र देताना चुकीच्या कागदपत्रांच्या आधारे दिले जाऊ नये,ही अपेक्षाही सदस्यांनी व्यक्त केली. ओबीसी समाजातील तरुणांना रोजगार आणि व्यवसाय करता यावा यासाठी त्यांना अण्णासाहेब पाटील महामंडळाप्रमाणे कर्जवाटप करण्यात अशा पद्धतीची योजना तयार करावी. अशी सूचना उपसमितीने केली आहे. त्याबरोबरच मंत्री छगन भुजबळ यांच्या अध्यक्षतेखालील यापूर्वीच्या समितीने केलेल्या शिफारसीही पुढील बैठकीत मांडण्याच्या सूचनाही करण्यात आल्याचे बावनकुळे यांनी सांगितले. आहेत. मंत्री छगन भुजबळ यांनी मराठा आरक्षणाच्या दोन अध्यादेशांवर आक्षेप घेतला होता. मात्र, त्यांना अंतिम अध्यादेश लागू करण्यात आल्याचे सांगितले. ओबीसी समाजासाठी खर्च करण्यात आलेला निधी अत्यंत कमी असून त्याबाबतही भुजबळ यांनी नाराजी व्यक्त केली अर्थविभागाने हा निधी ओबीसी मुलांच्या शिक्षण आणि वसतीगृहांच्या सुविधांसाठी तातडीने देण्याची मागणी केली. मंत्री पंकजा मुंडे यांनीही मराठा समाज हा सामाजिक मागास नसून आरक्षणाबाबत कागदपत्रांची अचूकता तपासूनच दाखले देण्यात यावेत अशी अपेक्षा व्यक्त केली. मंत्री संजय राठोड, गुलाबराव पाटील, दत्तात्रय भरणे, अतुल सावे, गणेश नाईक यांनी देखील आपापली भूमिका आणि मागण्या समितीसमोर मांडल्या.ओबीसी समाजातील तरुणांना रोजगार आणि व्यवसाय करता यावा यासाठी त्यांना अण्णासाहेब पाटील महामंडळाप्रमाणे कर्जवाटप करण्यात अशा पद्धतीची योजना तयार करावी. अशी सूचना उपसमितीने केली आहे. त्याबरोबरच मंत्री छगन भुजबळ यांच्या अध्यक्षतेखालील यापूर्वीच्या समितीने केलेल्या शिफारसीही पुढील बैठकीत मांडण्याच्या सूचनाही करण्यात आल्याचे बावनकुळे यांनी सांगितले. आहेत.

**उपसमितीसमोरील चर्चा**

१. मराठा जातीचा ओबीसी संवर्गात समावेश करण्यात येऊ नये व सरसकट मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्यात येऊ नये.
२. ओबीसी विद्यार्थ्यांना व्यावसायीक अभ्यासक्रमास १०० टक्के शिष्यवृत्ती लागू करण्यात यावी.
३. गुणवंत मुलांमुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी देण्यात येणारी शिष्यवृत्ती ७५ विद्यार्थ्यांची संख्या वाढवून २०० विद्यार्थी करण्यात यावी.
४. म्हाडा व सिडको तर्फे बांधून देण्यात येणाऱ्या घरकुल योजनेत ओबीसीसाठी आरक्षण लागू करण्यात यावे.
५. इतर मागास आर्थिक विकास महामंडळाला अँड. जनार्दन पाटील ओबीसी आर्थिक विकास महामंडळ असे नाव द्यावे.
६. प्रत्येक शहर, तालुका स्तरावर ओबीसी, व्हीजेजएनटी, एसबीसी. विद्यार्थ्यांसाठी सुसज्ज ग्रंथालय सुरु करण्यात यावे.
७. डॉ. पंजाबराव देशमुख ओबीसी समाजसेवक पुरस्कार जाहीर करण्यात यावा.
८. अनुसूचित जाती जमाती प्रमाणे ओबीसी, विजा., भज व विशेष मागास प्रवर्ग शेतकऱ्यांना १०० टक्के सवलतीवर राज्यात योजना सुरु करण्यात याव्यात.
९. ओबीसी आर्थिक विकास महामंडळाला एक हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात यावी.

**बंधू एकत्र येणे चांगले**

उद्धव ठाकरेजी आणि राज ठाकरेजी हे दोघे बंधू कौटूंबिक आणि नात्याने एकत्र आले ही चांगलीच गोष्ट आहे. त्यांच्यात राजकीय कारणामुळे वाद निर्माण झाला होता आता राजकीय कारणासाठी ते एकत्र येत आहेत. त्यामध्ये वाईट वाटण्याचे काहीच कारण नाही. त्यांनी त्यांच्या पद्धतीने निवडणूक लढावी आम्ही महायुतीच्या माध्यमातून सामोरे जाऊ.

**रोहित पवार यांनी राजकारणाची घाई करु नये**

सरकारमधील एखाद्या मंत्र्यावर आरोप करताना रोहित पवार यांनी काळजी घ्यावी. एखाद्या मंत्र्यावरील आरोप म्हणजे सरकार आणि जनतेवर झालेला आरोप असतो. मी विधिमंडळात दिलेले उत्तर महसूलमंत्री म्हणून दिले होते. त्याबाबतचा निर्णय मागील सरकारच्या काळात झाला होता. तसेच तेव्हा देखील दंड माफ करण्यात आला नव्हता. याप्रकरणाची सध्या सुनावणी सुरु असून ते प्रकरण प्रलंबित आहे. त्यामुळे रोहित पवार यांनी राजकारणाची एवढी घाई करु नये.

# ठाकरे बंधूंच्या भटीमुळे राजकारणाची समिकरणे बदलतील?

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील राजकारणाला एक वेगळी कलाटणी मिळणार असल्याची चर्चा ठाकरे बंधूंच्या भेटीमुळे राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे. त्यामुळे राज्यातील सत्ताधारी महायुतीच्या भूवया उंचावल्या आहेत. ठाकरे शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यात तब्बल अडीच तास शिवतिर्थ या राज ठाकरे यांच्या निवासस्थानी चर्चा झाली. या राजकीय भेटीने राज्यात राजकीय वातावरण चांगलेच तापणार असे मानले जात आहे. ठाकरे शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी आज मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची त्यांच्या 'शिवतीर्थ' या निवासस्थानी जाऊन भेट घेतली मात्र ही भेट कौटुंबिक नव्हती. ठाकरे बंधुंमध्ये आज प्रथमच राजकीय बैठक झाली. त्यामुळे राज्याच्या राजकारणाला कलाटणी मिळणार अशी चर्चा आहे. राज्यात पुढील काही महिन्यात पंचायत समिती,जिल्हा परीषद, नगरपालिका,नगरपरीषद,महानगरपालिकांच्या निवडणुकीसंदर्भात दोन्ही ठाकरेंमध्ये बैठक झाल्याची सूत्रांची माहिती आहे. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरेंमध्ये तब्बल अडीच तास बैठक झाली. या बैठकीला खासदार संजय राऊत आणि आमदार अनिल परब आणि मनसेचे नेते बाळा नांदगावकर उपस्थित होते.ठाकरे बंधूची ही भेट राजकीय नसल्याचे सांगण्यात येत असले तरी सूत्रांच्या माहितीनुसार उद्धव ठाकरे आपल्या मातोश्री या निवासावरून राज ठाकरे यांच्या शिवतिर्थ या त्यांच्या निवासस्थानी जाऊन दसरा मेळाव्याचं निमंत्रण दिल्याची चर्चा सुरू आहे. यावेळी दोन्ही ठाकरे बंधुमध्ये तब्बल अडीच तास झालेल्या या चर्चेवेळी विधानपरीषद सदस्य अनिल परब आणि खासदार संजय राऊत देखील उपस्थित होते. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्यामध्ये पालिका निवडणुकींच्या वाटाघाटी बाबत पहिली बैठक पार पडली असल्याचे समजते. महत्वाची बाब म्हणजे येत्या दसरा मेळाव्यात मनसे आणि शिवसेना ठाकरे यांच्यामध्ये युतीची अधिकृत घोषणा होऊ शकते या चर्चेला आता उधान आले आहे. या भेटीवर आता राजकारणी नेत्यामधून प्रतिक्रिया येत आहेत. उद्धव ठाकरे यांच्याशी सोबत मनसेबाबत काँग्रेसची चर्चा झाली आहे. परंतू हायकमांड सोबतच्या चर्चेनंतर निर्णय होईल असे काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी म्हटले आहे. तर दुसरीकडे समविचारी पक्षांसोबत जाण्यासाठी नेहमीच तयार आहोत अशी प्रतिक्रिया राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाच्या नेत्या खासदार सुप्रिया सुळे यांनी दिली आहे. अधिकृतरित्या आमच्यामध्ये बैठका सुरू आहेत, असं मनसे नेते अविनाश जाधव यांनी म्हटलेय आहे. तर शिवसेना ठाकरे आणि मनसे यांची युती झाली तर महायुतीला फारसा फरक पडणार नाही प्रतिक्रिया मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली आहे. ठाकरे बंधू एकत्र आल्यास काही होणार नाही, असे भाजप नेते सुधीर मुनगंटीवार यांनी म्हटलं आहे. तर भाजपाचे प्रविण दरेकर यांनीही निवडणूका जवळ आल्या की अशा गाठीभेटी होत असतात असे म्हटले आहे.राज्यातील अनेक महत्त्वाच्या महापालिकांच्या निवडणुका येत्या तीनचार महिन्यात अपेक्षित आहेत. या निवडणुकांमध्ये भाजप-शिंदे गटाला टक्कर देण्यासाठी ठाकरे बंधू एकत्र येण्याची शक्यता आहे. विशेषतः मुंबई महापालिकेसारख्या महत्त्वाच्या निवडणुकीत मनसेची साथ मिळाल्यास शिवसेना ठाकरे पक्षाची ताकद वाढू शकते. त्यामुळे या निवडणुकीत युती करण्याबद्दल चर्चा सुरु असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. शिवसेना फुटीनंतर उद्धव ठाकरेंना अनेक आव्हानांला तोंड द्यावे लागत आहे. अशावेळी मनसेची साथ मिळाल्यास ठाकरेसेनेला आणि मनसेला सुद्धा बळ मिळू शकते. त्यामुळे यामुळे भाजप आणि शिंदे गटाला अधिक तोंड देता येऊ शकते. दोन्ही बंधूंचे दोन पक्ष असल्यामुळे मनसे शिवसेना वेगवेगळी लढल्यामुळे मराठी मतांचे विभाजन होते जर महापालिका किंवा इतरही निवडणुका दोन्ही ठाकरे बंधूंनी एकत्र लढविल्यास दोघांनाही फायदा होऊ शकतो. तसेच शिवसेना आणि मनसेच्या कार्यकर्त्यांमध्येही एक वेगळा उत्साह वाढेल. त्या पार्श्वभूमीवर दसरा मेळाव्याचे आमंत्रण देण्यासाठी उद्धव ठाकरे राज ठाकरेंच्या निवासस्थानी पोहोचल्याचे बोललं जात आहे. सध्या राज्यात भाजप आणि शिंदे गटाची युती मजबूत आहे. त्याला आव्हान देण्यासाठी विरोधी पक्षांना एकत्र येण्याची गरज आहे. ठाकरे बंधूंची संभाव्य युती भाजप-शिंदे गटाला एक मोठा राजकीय धक्का ठरू शकते. त्यामुळे भविष्यात सत्तेचे समीकरण बदलण्याची शक्यता आहे.

दरम्यान यापूर्वी राज ठाकरे यांनी मातोश्रीवर जाऊन उद्धव ठाकरे यांची भेट घेतली होती, त्यांनी उद्धव ठाकरे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या होत्या. या कौटुंबीक भेटीनंतर आता राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्यामध्ये राजकीय भेट झाली आहे.

# महाराष्ट्र जनसुरक्षा विधेयक २०२४' तातडीने रद्द करा या मागणीसाठी महाविकास आघाडीचे जोरदार निदर्शने

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**
महाराष्ट्र जनसुरक्षा विधेयक २०२४' हे लोकशाहीविरोधी व जनतेच्या मुलभूत अधिकारांवर घाला घालणारे असल्यामुळे हे विधेयक तात्काळ रद्द करण्यात यावे या मागणीसाठी महाविकास आघाडीच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे जोरदार निदर्शने करण्यात आली. या आंदोलनात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी-शरदचंद्र पवार, शिवसेना ठाकरे गट, कम्युनिस्ट पक्षासह विविध संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले.

या निदर्शनात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हा अध्यक्ष राजेंद्र फाळके, शिवसेना ठाकरे गट जिल्हाप्रमुख राजेंद्र दळवी, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष अभिषेक कळमकर, सेनेचे शहराध्यक्ष किरण काळे, भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे सुधीर टोकेकर, बन्सी सातपुते, श्रीराम खाकाळ, अशोक बाबर, हाजी शौकत तांबोळी, अल्पसंख्यांक अध्यक्ष अथर खान, योगीराज गाडे, निलेश मालपाणी, अनंत गारदे, नलिनी गायकवाड, रोहन शेलार, राजेंद्र भगत, फारूक रंगरेज, शरद पवार, अल्तमश जरीवाला, संदीप गुंड, पापामिया पटेल, समीर पठाण, बाबू कुरेशी, रियाज कुरेशी, गणेश कुलट, पोपट निमसे, बन्सी सातपुते, सुनिल दुधाडे, सतीश पवार, विकास उडानशिवे आदी उपस्थित होते.




यावेळी बोलताना राजेंद्र फाळके म्हणाले की, लोकशाही प्रक्रियेचा आदर न करता सार्वजनिक सुनावण्या न घेता विरोधकांचे म्हणणे पूर्णपणे ढवळून हे विधेयक मंजूर करण्यात आले आहे हे विधेयक राज्याला हुकूमशाही कडे नेणारे आहे. बहुमताचा आधार घेत सरकारने हे विधेयक विधानसभेत मंजूर केले. मात्र या प्रक्रियेत लोकशाहीच्या प्रथांचा अवमान झाला असून विरोधकांचे म्हणणे न ऐकता, सार्वजनिक चर्चा व जनमत न घेता हे विधेयक सादर करण्यात आले. त्यामुळे हे विधेयक रद्द करून महाराष्ट्राला होणाऱ्या हुकूमशाहीच्या धोक्यापासून मुक्त करण्यात यावे. महायुती सरकार या कायद्याचा वापर सामाजिक चळवळीतील कार्यकर्ते सरकार विरोधी आवाज उठवणारे सामान्य नागरिक तसेच विरोधी पक्षाचे कार्यकर्ते यांना दडपण्यासाठी करणार असल्याची भावना व्यक्त केली.शिवसेनेचे राजेंद्र दळवी म्हणाले की हे विधेयक कार्यकर्ते लेखक सामाजिक कार्यकर्ते व सरकारवर टीका करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला लक्ष करण्यासाठी वापरले जाऊ शकते त्यामुळे नागरिक व कार्यकर्त्यांमध्ये तीव्र असतोस व भीतीचे वातावरण निर्माण झालेले आहे तसेच कम्युनिस्ट पक्षाचे सुधीर टोकेकर म्हणाले की, जन सुरक्षा विधेयक हे लोकशाही विरोधी असून ते अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणणारे आहे. कोणतीही टीका किंवा आंदोलन हे सार्वजनिक सुव्यवस्थेला धोका मानले जाऊ शकते जे लोकशाहीला धोकादायक आहे हे विधेयक रद्द करण्याची मागणी करण्यात आली.पुढे निवेदनात म्हटले आहे की, 'महाराष्ट्र जनसुरक्षा विधेयक २०२४' मुळे सामान्य नागरिकांच्या स्वातंत्र्यावर गदा येणार असून सार्वजनिक आंदोलने, सरकारविरोधी भूमिका किंवा लोकशाही मार्गाने मांडलेले विचार यांना गुन्हेगारी कृत्य मानले जाण्याची शक्यता आहे. महाराष्ट्रातील लोकशाहीवादी वातावरण संपुष्टात येऊ नये म्हणून या विधेयकाचा तीव्र निषेध करण्यात येत आहे. जिल्हा व शहरातील पदाधिकाऱ्यांनी एकत्र येऊन या विधेयकाविरोधात आवाज उठवला असुन तात्काळ हा विधेयक रद्द करण्याची मागणी करण्यात आली आहे

# डिजिटल मीडियाच्या राज्यस्तरीय अधिवेशनास बहुसंख्येने उपस्थित रहा-जिल्हाध्यक्ष दिनकर शिंदे

**गेवराई (प्रतिनिधी):**अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेची सलग्न असलेल्या डिजिटल मीडिया परिषदेचे पहिले राज्यस्तरीय अधिवेशन छत्रपती संभाजी नगर येथे दिनांक १४ सप्टेंबर २०२५ रोजी होत आहे या पार्श्वभूमीवर बीड जिल्हा डिजिटल मीडिया परिषदेच्या जिल्हास्तरीय पदाधिकाऱ्यांची शासकीय विश्रामगृह बीड येथे जिल्हाध्यक्ष दिनकर शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली या राज्यस्तरीय अधिवेशनाला बहुसंख्येने उपस्थित राहावे असे आवाहन त्यांनी केले. मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख यांच्या नेतृत्वाखाली आणि डिजिटल मीडिया परिषदेचे राज्य अध्यक्ष अनिल वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली छत्रपती संभाजीनगर येथील संत एकनाथ रंगमंदिर येथे १४ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता होणाऱ्या डिजिटल मीडिया परिषदेच्या पहिल्या राज्यस्तरीय अधिवेशनाच्या तयारीसाठी डिजिटल मीडिया परिषदेचे जिल्हाध्यक्ष दिनकर शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ७ सप्टेंबर रोजी शासकीय विश्रामगृह बीड येथे जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक संपन्न झाली.



यावेळी संवाद साधताना डिजिटल मीडिया परिषदेचे जिल्हाध्यक्ष दिनकर शिंदे म्हणाले की, पत्रकार बांधवांसाठी प्रिंट मीडिया आणि डिजिटल मीडिया ही एकाच गाडीची दोन चाकी झाली आहेत. राज्यकर्ते आणि समाज यांच्या मधला दुवा म्हणून काम करणाऱ्या या दोन्ही क्षेत्रातील पत्रकारांसाठी मराठी पत्रकार परिषद सातत्याने काम करते. विविध मागण्यांसह डिजिटल मीडियातील पत्रकारांना सुद्धा शासकीय जाहिराती, संरक्षण आणि शासनाची अधिस्वीकृती मिळावी या मागण्यांसाठी मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख यांच्या नेतृत्वाखाली डिजिटल मीडिया परिषद सातत्याने काम करत आहे. याच अनुषंगाने राज्यातील सर्व पत्रकारांना एकत्रित आणून संवाद साधण्यासाठी डिजिटल मीडिया परिषदेचे पहिले राज्यस्तरीय अधिवेशन छत्रपती संभाजीनगर येथे होत आहे. दोन सत्रात होणाऱ्या या अधिवेशनात १००० पत्रकारांची व्यवस्था करण्यात आली असून डिजिटल मीडियात काम करण्याबाबत योग्य प्रशिक्षण दिले जाणार आहे. त्यामुळे या अधिवेशनाला बीड जिल्ह्यातील पत्रकार बांधवांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हाध्यक्ष दिनकर शिंदे यांनी केले. यावेळी बीड जिल्ह्यातील विविध तालुक्यातील पदाधिकाऱ्यांच्या निवड जाहीर करून त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. या जिल्हास्तरीय बैठकीस बीड जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील अध्यक्ष व पदाधिकारी, पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डीवायएफआयच्या जिल्हा अध्यक्षपदी सुहास झोडगे तर सचिवपदी विशाल देशमुख


**अंबाजोगाई (प्रतिनिधी):** डेमोक्रेटिक युथ फेडरेशन ऑफ इंडिया (डीवायएफआय)चे १३वे बीड जिल्हा अधिवेशन सोमवार दि. ८ सप्टेंबर रोजी अंबाजोगाई येथे संपन्न झाले. अधिवेशनाची सुरुवात डीवायएफआयचे ध्वज फडकावून आणि शहीद भगतसिंग यांना अभिवादन करून झाली. डीवायएफआयचे राज्य अध्यक्ष नंदू हाडळ यांच्या हस्ते केले. त्याअगोदर डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौक दरम्यान रॅली काढण्यात आली.अधिवेशनाचे उद्घाटन लेफ्टनंन प्रा.डॉ.राजकुमार थोरात यांनी केले .संघटनेचे राज्य सचिव दत्ता चव्हाण ,सुरेश भोये यांनी मार्गदर्शन केले.तसेच अधिवेशनास कॉ.रोहिदास जाधव कॉ. अशोक थोरात, कॉ.मीरा शिंदे, कॉ.बब्रुवान पोटभरे, कॉ.अजय बुरांडे यांनी शुभेच्छा दिल्या.उद्घाटन सत्राच्या अध्यक्षस्थानी जिल्हा अध्यक्ष मोहन जाधव हे होते. अधिवेशनास बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई, माजलगाव, परळी, वडवणी, धारूर, गेवराई, बीड व इतर सर्व तालुक्यातील प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी आगामी काळात जिल्ह्यात संघटनेची बांधणी करण्यासाठी व संघटना वाढीसाठी २३ सदस्यांची नवीन बीड जिल्हा कमिटी निवडली.




यामध्ये डी वाय एफआयचे नवनिर्वाचित जिल्हा अध्यक्ष म्हणून सुहास झोडगे यांची तर जिल्हा सचिव म्हणून विशाल देशमुख यांची निवड करण्यात आली. उपाध्यक्ष म्हणून देविदास जाधव भगवान पवार तर सहसचिव म्हणून . प्रशांत मस्के,मनोज देशमुख कोषाध्यक्ष सुहास जयभाये सचिव मंडळ सदस्य मोहन जाधव फारुख सय्यद,सिद्राम सोळंके यांची निवड करण्यात आली. जिल्हा कमिटीचे सदस्य म्हणून विजय घुगे,मुंजाहरी नवघरे,अशोक भुंबे, कुंडलिक खेत्री, संतोष जाधव,मनोज स्वामी, भाऊसाहेब रणदिवे,सचिन टिळक, जगन्नाथ पाटोळे,मोहम्मद शेख,विजय राठोड,विनायक चव्हाण यांची निवड करण्यात आली. यांचीआणि नवीन जिल्हा कमिटीचे अभिनंदन करण्यात आले. संघटनेचे माजी जिल्हाउपाध्यक्ष सुहास चंदनशिव,प्रकाश उजगरे,मदन वाघमारे, मुक्तेश्वर,कडभाने यांनी संघटनेतून निवृत्ती घेतली. त्यांनी त्यांचा अनुभव सांगितला. अधिवेशन समारोपप्रसंगी नूतन जिल्हा अध्यक्ष व जिल्हा सचिव यांनी मनोगत व्यक्त करत आगामी काळात जिल्ह्यातील युवकांचे प्रश्न नेटाने संघटनेच्या माध्यमातून सोडवण्यासाठी व जिल्हाभरामध्ये संघटना अधिक भक्कम करण्याचा निर्धार व्यक्त केला. अधिवेशन यशस्वी करण्यासाठी आकाश कसबे, वैभव राजमाने, अनिल फुले ,नरेश चव्हाण ,संजय टिपरे,सारंग भगत,प्रथमेश उपाडे,अभिमन्यू माने,रामदास घाडगे,आकाश थोरात, विजय इंगळे,अजय आगळे, हमीद,अभिजित भालेराव,लखन पवार,रोहित काळुंके,रमाकांत कसबे, आदींनी अथक परिश्रम घेतले.

## शिवाजी पार्कवर उद्धव ठाकरेंचाच आवाज घुमणार

# दसरा मेळावा घेण्यास महापालिकेची परवानगी, मेळाव्यासाठी घातल्या २५ अटी



**मुंबई (वृत्तसंस्था)**–शिवसेनेच्या दसरा मेळाव्याची ओळख असलेल्या शिवाजी पार्क मैदानावर यंदाही उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला मेळावा घेण्यासाठी परवानगी मिळाली आहे. मात्र, महानगरपालिकेने ही परवानगी देताना शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला २५ अटी घातल्या आहेत. या अटींची पूर्तता करण्याचे निर्देश महापालिकेने दिले आहेत.शिवसेनेच्या स्थापनेपासून शिवाजी पार्क हे दसरा मेळाव्याचे मुख्य केंद्र राहिले आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने शिवाजी पार्कवर दसरा मेळावा घेण्यासाठी महापालिकेकडे अर्ज केला होता. महापालिकेने तो अर्ज स्वीकारून ठाकरे गटाला दसरा मेळावा घेण्याची परवानगी दिली आहे. त्यामुळे आता पुन्हा एकदा शिवाजी पार्कवर ठाकरेंचा 'आवाज' घुमणार आहे.दरवर्षीप्रमाणे यंदाही राज्याच्या कानाकोपऱ्यातून शिवसैनिक हे भाषण ऐकण्यासाठी मोठ्या संख्येने येण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे, महापालिका निवडणुकीच्या तोंडावर हा मेळावा होत असल्याने यातून उद्धव ठाकरे काय भूमिका मांडणार आणि शिवसैनिकांना काय मार्गदर्शन करणार, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.शिवसेनेच्या स्थापनेपासून दरवर्षी शिवाजी पार्कवर शिवसेनेचा दसरा मेळावा होतो. पण शिवसेनेच्या फुटीनंतर या ठिकाणी मेळावा घेण्यासाठी शिंदे गटानेही परवानगी मागितली होती. त्यामुळे गेल्या तीन वर्षांपासून या मैदानावरील मेळाव्यासाठी दोन्ही गटांमध्ये रस्सीखेच होताना दिसते. यंदा मात्र यावर जास्त काही वाद न होता, हे मैदान उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेला मिळणार आहे. तर शिंदेंचा मेळावा हा आझाद मैदानावर होणार आहे.

# सेंटेन्स सोशल सेंटरच्या वतीने बीज महोत्सव

**बीड (प्रतिनिधी)**–सेन्टेन्स सोशल सेंटरच्या पुढाकाराने आयोजित बीज महोत्सव अत्यंत उत्साह पार पडला या कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण म्हणजे माननीय जिल्हाधिकारी श्री विवेक जॉन्सन सरांचे महिलांना दिलेले मार्गदर्शन हे आपल्या प्रेरणादायी भाषणामध्ये जॉन्सन सरांनी महिलांच्या सामर्थ्याचे आणि त्यांच्या योगदानाचे प्रशंसा करताना सांगितले की महिला सक्षम झाली तर ती केवळ आपले घरच नव्हे तर संपूर्ण देशाच्या विकासात मोलाची भूमिका बजावू शकते तिने हाती घेतलेले प्रत्येक काम पूर्णत्वास नेत असते त्यामुळे महिलेचे योगदान हे अमूल्य आहे त्यांनी पुढे सांगितले की शेतकरी महिला आपल्या मेहनतीमुळे केवळ शेत नव्हे तर संपूर्ण कुटुंबाला उभारी देते शेतकरी महिलांना आवश्यक त्यावेळी शासनामार्फत योग्य ती मदत दिली जाईल असे त्यांनी स्पष्ट आश्वासन दिले महिलांच्या सक्षमीकरणाबद्दल बोलताना सरांनी यावर भर दिला की महिलांनी आत्मविश्वासाने पुढे आले पाहिजे लघुउद्योग शेतीपूरक व्यवसाय शिक्षण आणि समाजकार्य या सर्व क्षेत्रात महिलांची उपस्थिती महत्त्वाची आहे सरकार व प्रशासन अशा प्रयत्नशील महिलांच्या पाठीशी सदैव उभे राहील या कार्यक्रमात उपस्थित सर्व महिलांनी कलेक्टर सरांचे मार्गदर्शन प्रेरणादायी असल्याचे सांगितले विशेषता शेतकरी महिलांसाठी दिलेले आश्वासन त्यांना आत्मविश्वास देणारे ठरले या कार्यक्रमासाठी बहिरवाडी गावचे सरपंच मंडळ अधिकारी ग्रामसेवक उपस्थित होते सरते शेवटी सिस्टर नी आणि त्यांच्या कर्मचाऱ्यांचे कामाचे कौतुक कलेक्टर सरांनी केले.

# दादांचा बोलण्याचा सूर रागाचा वाटू शकतो,पण त्यांचा हेतू समजून घेणे गरजेचे-रोहिणी खडसे

**जळगाव (वृत्तसंस्था)**–महिला पोलिस अधिकारी अंजना कृष्णा यांना दमदाटी केल्याच्या प्रकरणात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या नेत्या रोहिणी खडसे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची जोरदार पाठराखण केली आहे. अजित पवारांचा बोलण्याचा सूर कदाचित रागाचा वाटू शकतो, पण त्यांचा हेतू समजून घेणे महत्त्वाचे आहे, असे त्यांनी म्हटले आहे.उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी महिला आयपीएस अधिकारी अंजना कृष्णा यांना फोनवरून दमदाटी केल्याचा एक कथित व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. या प्रकरणी अजित पवारांवर टीकेची झोड उठली असताना राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाचे नेते सातत्याने त्यांची पाठराखण करताना दिसून येत आहे. रोहित पवार यांनी सुरुवातीला या प्रकरणात त्यांची पाठराखण केली. त्यानंतर आता शरद पवार गटाच्या महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्षा रोहिणी खडसे यांनीही या प्रकरणी त्यांची पाठराखण केली आहे.रोहिणी खडसे याविषयी बुधवारी एका मराठी वृत्तवाहिनीशी बोलताना म्हणाल्या की, अजित पवार काही चुकीचे बोललेत असे मला वाटत नाही. या सर्व प्रकरणात त्यांचा हेतू पाहणे महत्त्वाचे आहे. दादांचा स्वभाव, त्यांचा बोलण्याचा टोन पाहता अनेकदा ते समोरच्याला रागात बोलत असल्याचे वाटते. त्यामुळे ते या प्रकरणी जे काही बोलले, त्या बोलण्याचा हेतू काय होता हे पाहणे महत्त्वाचे आहे. अजित पवारांच्या बोलण्याचा सूर अनेकदा रागाचा वाटू शकतो. पण त्यांचा उद्देश काय होता हे समजून घेणे आवश्यक आहे, असे त्या म्हणाल्या.तत्पूर्वी रोहित पवार यांनी एका ट्विटद्वारे अजित पवारांची पाठराखण केली होती. तसेच चहापेक्षा केटली गरम झाल्याचेही ते म्हणाले होते. कुर्डुवाडी प्रकरणात महिला आयपीएस अधिकारी यांनी घेतलेली भूमिका योग्यच होती. पण त्याठिकाणी झालेला घोळ अजितदादांच्या हिंदीमुळे आणि बोलण्याच्या शैलीमुळे झाला हे संपूर्ण महाराष्ट्राला माहिती आहे. याबद्दल स्वतः अजितदादांनी दिलगिरी व्यक्त केली. पण तरीही जाणूनबुजून काही प्रामाणिक पण सिलेक्टिव्ह भूमिका घेणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांना पुढे करून मीडिया ट्रायल केली जात आहे हे मात्र नक्की! मित्रपक्षांच्या नेत्यांची विनाकारण मीडिया ट्रायल करण्यापेक्षा शेतकऱ्यांच्या प्रश्नांची, युवांच्या प्रश्नांची, महिला सुरक्षेच्या विषयाची, पुरावे दिलेल्या भ्रष्टाचार प्रकरणांची मीडिया ट्रायल करून राज्याच्या नेतृत्वाने कार्यवाही केली तर अधिक योग्य राहील!.राजकीय स्कोअर सेट करण्यासाठी आपल्या नेत्याची विनाकारण मीडिया ट्रायल घेतली जात असताना पक्षाच्या दोन तीन नंबरच्या जेष्ठ नेत्यांनी मात्र कुरघोड्या करणाऱ्या मित्रपक्षाला प्रो भूमिका घेऊन आपल्याच पक्षात स्वहितासाठी अंतर्गत कुरघोड्या करणे कितपत योग्य आहे? असो पक्षात चहापेक्षा किटली गरम असणारे एक दोन सहकारी असले की आमदार सोबत असूनही सर्वकाही आलबेल असतेच असे नाही, याचा अनुभव पक्ष नेतृत्वाला यानिमित्ताने आलाच असेल, असे रोहित पवार म्हणाले.



# नदीवर पूल नसल्याने गावकऱ्यांचे हाल; तळोदा घोडगाम टाकली रस्त्यावर जीवघेणा प्रवास

**नंदुरबार । दिपक गोसावी**

तळोदा शहरापासून साधारणतः १५ ते १६ किलोमीटर अंतरावर असलेल्या घोडमाग, टाकली येथील गावकऱ्यांना आजही मूलभूत सोयीसुविधांपासून वंचित राहावे लागत आहे. घोडमाग टाकली येथे जाण्यासाठी रस्ता आहे, मात्र तो केवळ खर्डीपर्यंत. त्यानंतर बोरवाण करत गावकऱ्यांना पायपीट करावी लागते. यातही मोठी अडचण म्हणजे रस्त्यात येणारी नदी. नदीवर पूल नसल्यामुळे पावसाळ्यात गावकऱ्यांचे अतोनात हाल होत आहेत. जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत आहे.

खर्डीपासून घोडमाग हे अंतर अवघे सहा किलोमीटर असले तरी, हा प्रवास गावकऱ्यांसाठी जीवघेणा ठरत आहे. पावसाळ्यात नदीला पाणी जास्त असल्यास, ती पार करणे शक्य होत नाही. याचा सर्वाधिक फटका आजारी व्यक्तींना बसतो. अनेकदा वेळेवर उपचार न मिळाल्याने गंभीर परिस्थिती निर्माण होते. असे असतानाही, अनेक खासगी वाहनधारक जास्त भाड्याच्या हव्यासापोटी बोलेरोसारखी वाहने घेऊन या मार्गावरून धोकादायक प्रवास करतात. दुचाकीस्वार देखील जीव मुठीत धरून नदी पार करतात.

दिनांक १० सप्टेंबर रोजी सकाळी अशीच एक हृदयद्रावक घटना घडली. घोडगामहून सावरपाडा मार्गे धनपूरहून तळोदाकडे येणारे एक खासगी वाहन नदी पार करताना अचानक बंद पडले. पाण्याचा प्रवाह जास्त असल्याने वाहन वाहून जाईल, अशी भीती प्रवाशांना वाटू लागली. प्रसंगावधान राखून सर्व प्रवासी आणि चालकाने कसेतरी वाहनातून बाहेर पडून किनारा गाठला. त्यानंतर बराच वेळ प्रयत्न केल्यानंतर, गावातील लोकांच्या आणि ट्रॅक्टरच्या मदतीने वाहन बाहेर काढण्यात आले. या घटनेमुळे गावकऱ्यांमधील भीती आणखी वाढली आहे.

गेले अनेक वर्षे गावकऱ्यांना या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. घोडमाग येथील रहिवासी दिलीप पटले यांनी सांगितले की, चारही महिने आम्हाला हा त्रास सहन करावा लागतो. नदीवर पूल नसल्याने आमच्या अडचणी वाढत आहेत. प्रशासनाने या गंभीर समस्येकडे लक्ष देऊन तातडीने नदीवर पूल बांधावा, अशी मागणी दिलीप पटले यांनी गावकऱ्यांच्या वतीने केली आहे. पूल बांधल्यास विद्यार्थ्यांची, रुग्णांची आणि सर्वसामान्य नागरिकांची मोठी सोय होईल, अशी आशा त्यांनी व्यक्त केली आहे.



## वंचितच्या जन आक्रोश महामोर्चास सर्व सामान्य जनतेने मोठ्या संख्येने उपस्थित राहावे: किशोर भोले

**बीड । प्रतिनिधी**

सर्व सामान्य जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी आता सत्ताधाऱ्यांना कुठलेही देणेघेणे राहिलेले नाही खोटे आश्वासन देऊन सर्व सामान्य जनतेचे मते घ्यायचे आणि खुर्ची मिळाली कि सामान्य जनतेला वार्यावर सोडायचे परंतु नेहमी सातत्याने कष्टकरी, कामगार, शेतकरी, शेतमजूर ,उपेक्षित, निराधार ,बेघर, भुमिहीन, वंचित यांच्या प्रश्नाला न्याय देण्यासाठी वंचित बहुजन आघाडी कायम सोबत असते संविधानिक हक्क आणि अधिकारा पासून कोसो दूर असलेल्यांना कायद्यानुसार पध्दतीने प्रश्न सोडविण्यासाठी एकमेव आदरणीय अँड बाळासाहेब आंबेडकर हे कायम सोबत असतात त्यामुळे सर्व सामान्य जनतेने लक्षात घेतले पाहिजे की आदरणीय अँड बाळासाहेब आंबेडकर यांच्या राजकीय सामाजिक लढ्यात सर्व सामान्य जनतेने एकजुटीने सोबत राहुन येणार्या काळात वंचित बहुजन आघाडीची ताकत वाढवली पाहिजे म्हणून वंचित बहुजन आघाडी गेवराई तालुक्याच्या वतीने दिनांक १२/०९/२०२५ वार शुक्रवार रोजी ठिक ११ ०० वाजता तहसील कार्यालयावर जन आक्रोश



महामोर्चा धडकणार आहे तरी तालुक्यातील सर्व गायरान धारक , निराधार, अपंग, शेतकरी,शेतमजूर, अल्पभूधारक, कष्टकरी कामगार घरकुलापासुन वंचित राहीलेले घरकुल धारक यासह गेवराई तालुक्यातील भारतीय बौद्ध महासभा सम्यक विद्यार्थी आंदोलन युवक आघाडी माथाडी कामगार आघाडी समता सैनिक दल महिला आघाडीसह चळवळीतील आजी माजी तालुका पदाधिकारी कार्यकर्ते यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन वंचित बहुजन आघाडी गेवराई तालुका महासचिव किशोर भोले यांनी केले आहे.

## मुस्लिम बांधवांना मिठाई देत राजकिशोर मोदी मित्र मंडळाने जोपासला हिंदू मुस्लिम एकोपा

**अंबाजोगाई (प्रतिनिधी):** मुस्लिम धर्म गुरू महंमद पैगंबर यांचा जन्मदिवस हा ईद मिलादूनबी म्हणून मुस्लिम बांधव साजरी करतात. ही ईद शुक्रवार दि ५ सप्टेंबर रोजीच झाली . मात्र त्या काळात हिंदू धर्मियांचा गणेशोत्सव सुरू होता . त्यामुळेच अंबाजोगाई शहरात मुस्लिम बांधवानी हिंदू मुस्लिम एकतेचे भावना दाखवत ईदच्या दिवशी निघणारा मुस्लिम बांधवांचा जुलूस हा बुधवार दि १० सप्टेंबर रोजी काढण्याचे मुस्लिम बांधवानी ठरवले. त्याप्रमाणे दि १० रोजी अंबाजोगाई शहरात मुस्लिम बांधवानी मोठा जुलूस (मिरवणूक) काढला होता. या जुलूसमध्ये शेकडो मुस्लिम बांधव मोठ्या उत्साहात सहभागी झाले होते.

या जुलूसमध्ये सहभागी झालेल्या सर्व मुस्लिम बांधवांचे अंबाजोगाई शहराचे माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी आपल्या सहकाऱ्यांसोबत मिठाई वाटून जोरदार स्वागत केले. जुलूसमध्ये मिठाई



देत राजकिशोर मोदी व मित्र मंडळाने हिंदू मुस्लिम एकोप्याचे दर्शन घडविले. यावेळी जुलूस मध्ये मोदी यांच्या सोबत बबन लोमटे, शहराध्यक्ष महादेव आदमाणे, धम्मा सरवदे उपाध्यक्ष सय्यद रशीद, खालेद चाऊस, डॉ राजेश इंगोले, पंडित हुलगुंडे, किशोर परदेशी, विजय रापतवार , अंकुश हेडे, सुभाष पाणकोळी,भिमसेन लोमटे, अशोक जेधे, गणेश मसने, शाकेर काझी, जावेद गवळी, सुशील वाघमारे, अकबर पठाण, खलील जाफरी, कैलास कांबळे, दत्ता सरवदे, आकाश कऱ्हाड, विशाल पोटभरे , उज्जेन बनसोडे, शेख अस्लम, रोशन लाड यांच्यासह अनेक सहकारी उपस्थित होते. ईद-ए-मिलादुन्नबी हा सण (ईद) मुस्लिम समाजातील महत्त्वाच्या सणांपैकी एक सण (ईद)आहे. हा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो. या दिवशी सर्व मुस्लिम बांधव एकत्र येऊन शहरात मोठा जुलूस काढण्यात येतो. जागोजागी हिंदू मुस्लिम बांधवांच्या वतीने ठिकठिकाणी चहा पाणी, थंड, खिचडी वाटण्यात येते. राजकिशोर मोदी यांनी देखील जुलूसमधील सहभागी असलेल्या सर्व मुस्लिम बांधवांचे पुष्पहार , शाल ,व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात येत होते. यासोबतच जुलूस मध्ये सहभागी झालेल्या मुस्लिम बांधवाना मिठाईचे वाटप करून करून त्यांना ईदच्या शुभेच्छा दिल्या. मुस्लिम बांधव देखील राजकिशोर मोदी यांना अतिशय आपुलकीने भेटताना दिसत होते. यावरून राजकिशोर मोदी मित्र मंडळाने हिंदू मुस्लिम ऐक्याचे सौदारहय तसेच एकोप्याची परंपरा कायम ठेवल्याचे बोलले जात आहे.

## बोरद गावात 'ना भूतो ना भविष्यती' असा भव्य नामकीर्तन सोहळा संपन्न

**नंदुरबार । दिपक गोसावी**

बोरद गावात नुकताच संत दगा महाराज यांच्या प्रेरणेने एक अत्यंत भव्य आणि अविस्मरणीय असा नामकीर्तन सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. 'संतकमे करजो आणि करायी लेजो' या संत दगा महाराजांच्या ब्रीद वचनावर आधारित १०८ गावांच्या संकल्प यात्रेतील हा ८७ वा सोहळा होता, जो बोरद गावातील रामभक्तांनी आणि ग्रामस्थांनी एकत्रित येऊन साजरा केला.

हा सोहळा गेल्या सात दिवसांपासून सुरू होता. या काळात संपूर्ण गाव रामधूनमध्ये तल्लीन झाले होते. दररोज पहाटे ५ वाजता गावात रामधूनची प्रभातफेरी निघत असे आणि रात्री ८ वाजता राम मंदिरात नामजप सुरू होत असे. या सोहळ्यात बोरदसह कलमाडी, जावदा, तळवे, आमलाड, तऱ्हावद, निझर, चौपाळा, म्हसावद, तऱ्हाडी,



मोरवड, मोड, कोळदे, शिंदे, कोरीट, पकाशा यांसारख्या परिसरातील अनेक गावांचे सुमारे १५०० ते २००० रामभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दिनांक १० रोजी या सोहळ्याची सांगता झाली. सकाळी ८ वाजता संत दगा महाराजांची पालखी वाजत गाजत संपूर्ण गावातून काढण्यात आली. त्यानंतर मुख्य राम मंदिर चौकात रात्री ११ वाजेपर्यंत हा सोहळा मोठ्या उत्साहात सुरू होता. यानंतर उपस्थित सर्व रामभक्तांना चहा, फराळ आणि नाश्ता देण्यात आला. बोरद येथील रामभक्तांचा उत्साह पाहून संत दगा महाराजांच्या अनुयायांनी हा सोहळा 'डोळ्याचे पारणे फेडणारा' असल्याचे म्हटले.सात दिवस चाललेल्या या सोहळ्यामुळे संपूर्ण बोरद गावात भक्तीमय वातावरण तयार झाले होते. शेवटी, संत दगा महाराजांची पालखी कलमाडी येथील ग्रामस्थांच्या हाती सोपवून या भव्य सोहळ्याची सांगता झाली.

## आखिल भारतीय पेशवा संघटने कडुन सौ.पुजा कुलकर्णीचा सत्कार


**अंबाजोगाई (प्रतिनिधी)**–योगेश्वरी मंदिर ट्रस्टच्या कोषाध्यक्ष पदी सौ.पुजा कुलकर्णी यांची निवड झाल्यानंतर सर्वत्र आनंद व्यक्त होत असुन आखिल भारतीय पेशवा संघटनेने निवासस्थानी जावुन त्यांचा शाल, श्रीफळ देत सत्कार केला. त्यांच्या निवडीचा आम्हाला खुप आनंद झाल्याची प्रतिक्रिया कार्यकारी अध्यक्ष सुधीर धर्माधिकारी यांनी दिली. सौ.पुजा कुलकर्णी २०१६ ते १९ दरम्यान योगेश्वरी मंदिर ट्रस्ट संचालक पदावर काम करत होत्या. धर्मादाय आयुक्त बीड यांनी मंदिर ट्रस्टची पुनर्रचना केल्यानंतर परवा नुतन पदाधिकार्यांची निवड करण्यात आली. सचिव पदी गिरीधारीलाल भराडिया, उपाध्यक्ष अक्षय मुंदडा, सहसचिव कमलाकर चौसाळकर,कोषाध्यक्ष पदावर सौ.कुलकर्णी



यांची सर्वानुमते निवड झाली. निवडीचा आनंद साजरा करताना आखिल भारतीय पेशवा संघटनेच्या प्रमुख पदाधिकार्यांनी निवासस्थानी जावुन त्यांचा सर्हदय सत्कार केला. संघटनेचे जिल्हाध्यक्ष संजय देशपांडे, कार्यकारी अध्यक्ष सुधीर धर्माधिकारी, सचिव डॉ.दिलीप कुलकर्णी, कोषाध्यक्ष भास्कर देशपांडे, सदस्य अभय जोशी, प्रसिद्धीप्रमुख सौ.अंजली देशपांडे, शहराध्यक्ष श्रीमती अंजली चौधरी, अॅड.सौ.सुनिता जोशी आदींनी शाल, श्रीफळ देवुन त्यांचा सत्कार केला.जेष्ठ पत्रकार दत्ता आंबेकर त्यांच्या सुविद्य पत्नी सौ.शामल आंबेकर, सौ.उमा देशमुख यांच्यासह खोलेश्वर महाविद्यालयातील लिपीक अभिजित दोखणे आणि पंढरीनाथ जोशी यांनी सौ.पुजा कुलकर्णी यांचा सर्हदय सत्कार केला. आंबेकर हे तीर्थक्षेत्र रेणुका देवीचे पुजारी आहेत. सौ.पुजा कुलकर्णी आमच्या कौटुंबिक सदस्य असुन त्यांच्या निवडीने खुप आनंद झाल्याची प्रतिक्रिया दत्ता आंबेकर यांनी दिली.

## श्री ज्ञानेश्वरी जयंती निमित्त केज येथे त्रिदिवसीय कीर्तन महोत्सवाचे आयोजन







**केज । प्रतिनिधी**

दि.१३ सप्टेंबर रोजी श्री ज्ञानेश्वरी जयंती निमित्त श्रीराम मंदिर,केज येथे कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.दिनांक १३ सप्टेंबर रोजी सकाळी ११.०० वाजता श्री ज्ञानेश्वरी ग्रंथाची भव्य मिरवणूक निघणार आहे.संध्याकाळी ७.०० वाजता ७५० दिव्यांनी दीपोत्सव संपन्न होणार आहे.दि.१३ सप्टेंबर रोजी ह.भ.प.संतोष महाराज बिडगर (अंबाजोगाई),दि.१४ सप्टेंबर ह.भ.प.श्री बापू महाराज दातार (निफाड)दि.१५ सप्टेंबर रोजी सौ.तेजस्विनी धानोरकर (पुणे) यांची कीर्तन सेवा संपन्न होणार आहे. कीर्तनासाठी पंडित गंगाधर देव, श्री.बाळासाहेब अलासकर,श्री पद्मनाभ देव या मान्यवरांची साथ संगत लाभणार आहे.दिनांक१५ सप्टेंबर रोजी संध्याकाळी सात वाजता महाप्रसादाने कीर्तन महोत्सवाची सांगता होईल.तरी सर्व भाविकांनी या कीर्तन महोत्सवाचा आनंद घ्यावा असे आवाहन कीर्तन महोत्सव संयोजन समितीचे श्री. सचिनराव देशपांडे व ह.भ.प.श्री.भालचंद्र महाराज देव यांनी केले आहे.

## आजपासून अंबाजोगाई येथे किर्तन महोत्सव

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

शुक्रवार दि.१२ सप्टेंबर ते रविवार दि.१४ सप्टेंबर या कालावधीत दत्त संस्थान धाकटे देवघरच्या वतीने संत सर्वज्ञ दासोपंत यांच्या जन्मोत्सवा निमित्त तीन दिवसीय नारदीय कीर्तन महोत्सव होणार आहे. यात शुक्रवार दि.१२ सप्टेंबर रोजी परभणी येथील प्रख्यात महिला किर्तनकार ह.भ.प. स्मिता आजेगावकर, शनिवार दि.१३ सप्टेंबर रोजी ह.भ.प.डॉ.सविता मुळे(छत्रपती संभाजी नगर),तर दि.१४सप्टेंबर रविवार रोजी पुणेयेथील ह.भ.प.हरिहरबुवा नातू यांचे नारदीय किर्तन संध्याकाळी ७-०० वाजता देशपांडे गल्ली भागातील दत्त संस्थान धाकटे देवघर येथे होणार असूनभाविकांनी याचा



लाभ घेण्याचे आवाहन संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## रेल्वे लाईनच्या कामाचे साहित्य चोरून घेऊन जाताना एकजण पकडला

**वडवणी । प्रतिनिधी**

लाईनच्या कामाचे लोखंड स्टेरिंगसह इतर साहित्य चोरून घेऊन जात असताना आयशर कंपनीचा टेम्पो सह तिघे जण पकडले आहेत तर ४ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. ही घटना दि. ९ सप्टेंबर रोजी रात्री ११ वाजण्याच्या सुमारास वडवणी नजीक वेलकम मंगल कार्यालय येथे घडली आहे.याबाबत वडवणी पोलिसात गुन्हा दाखल केला आहे.शिवाजी नामदेव मोरे वय ३१ वर्ष व्यवसाय मॅनेजर रा. ता. जिल्हा बीड (ह.मु. बापूजी नगर बीड) यांनी याबाबत वडवणी पोलिसात तक्रार दिली आहे. आयशर टेम्पो चालक मज्जिन शहाबाजखाँ पठाण रा. इस्लामपुर बीड, विशाल सिंग कंपनी इंजिनिअर, आवेज पठाण रा. बीड व लोखंडभरण्यासाठी आणलेले लेबर यांनी संगणमत करून वेलकम मंगल कार्यालय वडवणी येथे रेल्वे लाईनचे लोखंड स्टेरिंग व जिओ सेल इत्यादी साहित्य ठेवल्या असणाऱ्या आयशर टेम्पो क्रमांक एम एच ४३ ९७ ९२ मध्ये अंदाजे तीन टन ३० कुंटल बारा एमएम चे लोखंड चोरून घेऊन जात असताना टेम्पो सह वरील मिळून आयशर टेम्पो किंमत २ लाख रुपये अंदाजे किंमत, व जुनी वापरती लोखंड २ लाख १० हजार रुपये असे एकूण असे चार लाख दहा हजार एकूण मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे आरोपींना पोलिसांनी अटक केली असून मॅनेजर शिवाजी नामदेव मोरे यांच्या फिर्यादीवरून गुन्हा र. नंबर २२०/२०२५ कलम ३०३ (२), ३ (५) बी एन एस प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे वडवणी पोलीस स्टेशनच्या सहाय्यक पोलीस सहाय्यक निरीक्षक वर्षा व्हगाडे - शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोहे उबाळे तपास करीत आहेत. तर याबाबत सहाय्यक पोलीस निरीक्षक वर्षा व्हगाडे यांच्याशी भ्रमणध्वनीद्वारे संपर्क केला असता त्यांनी सांगितले कि, एक आरोपीला अटक करण्यात आली आहे. इतर आरोपींचा तपास शोध सुरू आहे. अशी प्रतिक्रिया दिली आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077